दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -१०५ शनिवार,दि.२१ डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi | Year-5th | Issue-105 | Saturday, Dt.21 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघाची नमुना २० मधील आकडेवारी वेबसाईटवर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सहा विधानसभा मतदार संघाचे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ नमूना २० (त्री-२०) भाग-१ जिल्हयाच्या संकेतस्थळावर अद्यावत करण्यात आले असून त्याची लिंक यासोबत खालीलप्रमाणे देण्यात आली आहे.

# बीडमधील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढणार, दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## बीड घटनेची न्यायालयीन, एसआयटीमार्फत दुहेरी चौकशी, पोलीस अधिक्षकांची बदली
## परभणीतील घटनेची न्यायालयीन चौकशी होणार ;पोलीस अधिकारी निलंबित
## बीड, परभणीतील मृतांच्या कुटुंबियांना दहा लाखांची मदत

नागपूर ।प्रतिनिधी

**बीड, परभणी मधील घटना दुर्दैवी आहेत. या दोन्ही घटनांची सरकारने गंभीर दखल घेतली असून बीड जिल्ह्यातील हत्येच्या प्रकरणाची न्यायालयीन आणि एसआयटी अशी दुहेरी चौकशी केली जाईल. तर परभणी मधील संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. बीड, परभणी घटनांमधील दोन्ही मृतांच्या कुटुंबियांना दहा लाख रुपयांची आर्थिक मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. त्यानुसार बीड मध्ये हत्या झालेल्या सरपंच संतोष देशमुख आणि परभणी मधील घटनाक्रमात मृत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना ही दहा लाखांची मदत देण्यात येणार आहे.**

बीड मधील प्रकरणाची न्यायालयीन व एसआयटी मार्फत चौकशी करण्याबरोबर जिल्हा पोलीस अधिक्षकांची बदली करण्यात येईल. या प्रकरणातील दोषींवर मकोका अंतर्गत कारवाई करून बीड जिल्ह्यांतील भूमाफिया, वाळूमाफियांस गुन्हेगारीची पाळेमुळे खणू काढू, अशी स्पष्ट भूमिकाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विधानसभेत मांडली. परभणीत पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून त्यांनी वाजवी पेक्षा अधिक पोलीस बळाचा वापर केला आहे काय, याची चौकशी केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

बीड, परभणी येथील घटनेसंदर्भात विधानसभेत झालेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, परभणी जिल्ह्यातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भारताच्या संविधानाचा अपमान हा सर्व भारतीयांचा अपमान आहे. त्यामुळे हा अपमान सहन केला जाणार नाही. परभणी येथील कृत्य एका मनोरूग्णाने केले आहे. तो मनोरुग्ण असल्याचा स्पष्ट वैद्यकीय अहवालही उपलब्ध आहे. त्यामुळे अशा



परिस्थितीत सर्व राजकीय पक्षांनी तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे. या प्रकरणात कोंबिंग ऑपरेशन झाले नाही. परंतु पोलीसांनी वाजवीपेक्षा जास्त बळाचा वापर केला आहे काय याची चौकशी केली जाईल. ही चौकशी पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून करण्यात येईल. परभणीत सकल हिंदू समाजाचा मोर्चा हा सर्वपक्षीय होता. या मोर्चात बांग्लादेशमधील हिंदूसंदर्भात मागणी करण्यात आली होती. त्यामुळे ही हिंदू विरूद्ध दलित अशी दंगल नाही. परभणीत झालेल्या तोडफोडीत दुकान, वाहन, सरकारी कार्यालयांचे नुकसान झाले आहे असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बीड येथील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मोहीम हाती घेणार असून चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. बीडमध्ये आवाडा ग्रीन एनर्जी कंपनीने गुंतवणूक केली आहे. या कंपनीची कामे आम्हालाच द्या किंवा खंडणी द्या अशी मानसिकता काहींची तयार झाली आहे. त्यामुळे बीड प्रकरणातील मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्यांवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल. बीड जिल्ह्यातील पोलीसांनी देखील योग्य कारवाई करावी. गुन्हे दाखल करताना वस्तुस्थिती तपासावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान करणाऱ्या अमित शहा विरोधात बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निदर्शने

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी भारताच्या संसदेत आक्षेपार्ह विधान करणाऱ्या देशाच्या गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार ,संपर्कनेते सुनिलजी प्रभू साहेब संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर , जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काळे झेंडे दाखवून तीव्र आंदोलन करण्यात आले व अमित शहा यांचा जाहीर निषेध करण्यात आला.




**जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, परमेश्वर सातपुते आक्रमक**

(उर्वरीत पान २ वर)

## पेठ बीड हद्दीत गावठी पिस्टलने फायरील करुन जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या ३ आरोपींना अटक

### स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांची उल्लेखनीय कामगिरी

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १३/१२/२०२४ रोजी २ वा. सुमारास फिर्यादी अभिशेक विश्वास डोंगरे, रा. प्रकाश आंबेडकरनगर बार्शी नाका पेठ बीड यांचे राहते घरी आरोपी अक्षय शामराव आठवले, मनिष क्षीरसागर व इतर आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन मागील भांडण्याचे कारणाचा राग मनात धरुन जिवे मारण्याच्या उद्देशाने पिस्टलने गोळीबार करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. यावरुन आरोपी विरुध्द पो.स्टे.पेठ बीड येथे गुरनं ३८३/२०२४ कलम १०९,१९१(२), १९१(३), १९०, ६१(२), ११५(२), ३५२,३५१(२) इछड, सह कलम ३/२५ भारतीय शस्त्र अधिनियम व १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये दिनांक १३/१२/२०२४ रोजी गंभीर गुन्हयाची नोंदी झाली. गुन्हा घडल्यापासुन गुन्हयातील आरोपी हे फरार होते. त्यांचा शोध घेवुन अटक करण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांना दिले होते. सदर



गुन्हयाचा प्रथम तपास पो.स्टे. पेठ बीड यांनी केला त्यानंतर सदर गुन्हा गंभीर व रेकॉर्डवरील आरोपींनी केलेला असल्याने यांची गंभीरता लक्षात घेता मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी सदर गुन्हयाचा तपास श्री. उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचेकडे दिला. पो.नि. श्री.उस्मान शेख यांनी आरोपीला शोध घेण्यासाठी तपासाची चर्के फिरवले. गोपनिय बातमीदार खबऱ्यांची नेटवर्क एक्टीव केले. त्यातच पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे यांचे पथकाला वरील गुन्हयातील फरार आरोपी अक्षय आठवले व मनिष क्षीरसागर हे पुणे येथे लोणीकंद भागातील गोळेगाव शिवारात एका शेतामध्ये कच्चा बांधकाम असल्याचे ठिकाणी बसलेले आहेत अशी माहिती मिळाली,सदर आरोपी हे कुख्यात आहेत ते नेहमी गावठी कट्टे गावठी पिस्टल सोबत घेवुन फिरत असतात. त्यांना पकडण्यासाठी गेल्यावर ते पोलीसांवर सुध्दा फायरींग करण्यास मागे पुढे बघनार

(उर्वरीत पान २ वर)

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स )लेझर सेंटर

डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ

डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेझर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच
महिला मुळव्याध तज्ञ
डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
महिला रूग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.
मुळव्याध करीता विशेष उपचार
- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पिटलचा पत्ता
शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँण्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009


आपणास कळविण्यास अत्यंत दुःख होते की
स्व.वैभव विनायक वैद्य
गंगापुजन कार्यक्रम
शनिवार दि.२१ /१२/ २०२४ रोजी सकाळी १० वाजता
* शोकाकुल *
श्री. विनायक एकनाथराव वैद्य
सौ.रजनी विनायकराव वैद्य
श्रीमती. आरती वैभव वैद्य
चि. वंश वैभव वैद्य
* स्थळ *
स्थळ -तनिष्का अपार्टमेंट, जव्हेरी गल्ली, धोंडिपुरा बीड
* भोजन वेळ *
दुपारी.०१ ते ०५ पर्यंत.
* शोकाकुल : द्वारकाधीश मित्र मंडळ बीड

## रेल्वे पुलाच्या कामासाठी वळण रस्ता २० दिवस बंद



बीड ।प्रतिनिधी

बीड शहरानजिक रेल्वे पूलाचे काम सुरु असल्याने मार्गालगत असणारा वळण रस्ता बंद करण्यात येणार असून वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्या कपिल मुनी मंदिर पासून ज्या मार्गाने बीड रोड ओलांडून वाहने सध्याच्या वळण रस्त्याने जातात त्या रेल्वेमार्गालगतच्या वळण रस्त्यावर वाहतूक पुढील १५ ते २० दिवस बंद राहणार आहे, असे रेल्वेतर्फे जारी एका प्रसिध्दीपत्रात म्हटले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय

# प्रकाशाचे सांध्यपर्व!

भारतीय क्रिकेट संघ जेव्हा ऑस्ट्रेलियासारख्या कठीण दौऱ्यावर निघाला, तेव्हा त्यातील चार खेळाडू कारकीर्दीचा संधिकाल सुरू असलेले होते, आहेत. न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर सपाटून मार खाऊन ऑस्ट्रेलियात चाललेल्या या संघाकडून फारशी अपेक्षा नसतानाही या चमूने पहिला सामना जिंकला खरा; पण दुसऱ्या सामन्यातील वाताहत आणि तिसऱ्यात याच मार्गावरून वाटचाल सुरू असताना पाऊस मदतीला आल्याने वाचलेली इभ्रत पाहता, आत्ताचा संघ या दौऱ्यानंतर मोठ्या स्थित्यंतरातून जाणार हे स्पष्ट आहे. त्या स्थित्यंतरातील एक थोडा अनपेक्षित आणि चुटपुट लावून गेलेली 'कलाटणी' म्हणजे फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनची निवृत्ती. अश्विनचे वय पाहता खरे तर त्याची निवृत्ती अकाली वगैरे नाही. कोणताही चांगला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू वयाच्या विशीत आंतरराष्ट्रीय कारकीर्दीला सुरुवात करून तिशीच्या उत्तरार्धात निवृत्त होतो, तसा अश्विनही १४ वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळून ३८ व्या वर्षी निवृत्त झाला. निवृत्तीचा निर्णय वैयक्तिक आहे, असे तो सांगत असला, तरी भारतीय क्रिकेटमध्ये जे जे काही होते, ते कधीच वैयक्तिक राहात नाही. अश्विनच्या निर्णयालाही ते लागू होते. सामने जिंकून दिलेल्या क्रिकेटपटूला निवृत्त होताना चांगली मानवंदना मिळायला हवी होती, असे सूर उमटले, ते त्यामुळेच. 'मी त्याला अशा प्रकारे निवृत्त होऊ दिले नसते,' असे कपिलदेव यांनी बोलूनही दाखवले. पण, हा केवळ त्याच्याच निवृत्तीचा मुद्दा नाही, तर भरीव कामगिरी केलेल्या खेळाडूंच्या कारकीर्दीच्या संधिकालाबाबत भारतीय क्रिकेटने अधिक समंजस असण्याची गरज आहे, हा यातील महत्त्वाचा धडा आहे.

या धड्याकडे वळण्यापूर्वी अश्विनने जो वस्तुपाठ घालून दिला, त्याबाबत. अश्विन हा काही भारतीय क्रिकेटमधील अतिशय लोकप्रिय खेळाडूंचे जे परिमाण आहे, त्यात बसणारा नाही. नैसर्गिक उंची सोडल्यास व्यक्तिमत्त्वात वेगळा रुबाबदारपणा आहे, असेही नाही. त्याला संघात घेऊनही अंतिम ११ खेळाडूंत खेळवले नाही, म्हणून खूप मोठ्या चर्चा झडल्या किंवा त्यामुळेच कसा सामन्याच्या निकालावर परिणाम झाला, असेही अपवाद वगळता कधी म्हटले गेलेले नाही. तो काही जगातील अत्यंत अभिजात ऑफस्पिनर किंवा त्यांचा किमान वारसा चालवणारा वगैरेही नाही. पण, तरी त्याचे क्रिकेटमध्ये वेगळे स्थान आहे. किंबहुना हे सगळे नाही, तरी त्याच्या कामगिरीची क्रिकेटच्या इतिहासाला दखल घ्यावीच लागेल, हे त्याचे वैशिष्ट्य. एरवी १०६ कसोटी सामन्यांत ५३७ बळी घेणे हे गोलंदाजाकडे कला आणि कौशल्य दोन्ही असल्याशिवाय साध्य होत नाही. अश्विनची खासियत अशी की, त्याने कारकीर्दीच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर वैयक्तिक आणि सांघिक पातळीवर समस्या निवारकाची भूमिका बजावली आहे. तो अजून पुरता कायमचा फिरकी गोलंदाजही झालेला नसताना - भारताच्या १७ वर्षांखालील संघाच्या शिबिरात असताना त्याला पहिली समस्या कोणती भेडसावली असेल, तर भाषेची. त्यावर त्याने इतर कशाहीपेक्षा व्यावहारिक उत्तर शोधले, ते हिंदीची खासगी शिकवणी लावून. समस्या या सोडविण्यासाठी असतात, याची खूणगाठ मनाशी पक्की बांधून तो आपल्या गोलंदाजीबाबतही असेच प्रयोग करत राहिला. 'तू ऑफस्पिनची अभिजातता जप, जास्त प्रयोग करू नकोस,' असा कधी आगंतुक सल्ला किंवा हेटाळणीसुद्धा त्याच्या वाट्याला आलीच नाही, असे नाही. त्याने यावर हटकून स्वतंत्र उपाय शोधले, हा त्याचा धाडसीपणा. समोर खेळणाऱ्या फलंदाजाला आपण टाकत असलेल्या प्रत्येक चेंडूवर नवे प्रश्न विचारायचे, हे त्याचे यावरचे उत्तर! कधी टप्पा बदलून, कधी गोलंदाजीची धाव कमी-जास्त करून, कधी 'बोलिंग क्रीझ'चा अतरंगी वापर करून आणि अनेकदा 'कॅरम बॉल'च्याच विविध क्लृप्त्या अजमावून फलंदाजाला कायम बुचकळ्यात पाडणे हा त्याचा आवडता छंद. प्रयोगाला अश्विन कधी घाबरला नाही आणि त्यासाठी सराव जाळ्यात वाट्टेल तेवढे कष्ट घ्यायला तो कमीही पडला नाही. भारताबाहेरच्या खेळपट्ट्या फिरकीला पोषक नसतानाही त्याने यश मिळवले, ते या जोरावर. अर्थात, तेथे कदाचित आपल्या गोलंदाजीची फारशी करामत चालणार नाही, ही समस्या असू शकते म्हटल्यावर त्याने फलंदाजी मजबूत करण्याचा उपायही शोधलाच. आठव्या क्रमांकावर फलंदाजीला येऊन साडेतीन हजारांहून अधिक धावा, सहा शतके

# आभासी दुनियेत सावध रहा!

आपण सायबर गुन्हेगारीचा विचार करताना समाज माध्यमांचा गैरवापर हा लक्षात ठेवला पाहिजे. समाज माध्यमांचा वापर करून महिलांना आर्थिक दृष्ट्या फसवले तर जातेच सोबतच अनेक प्रकरणांमध्ये लैंगिक अत्याचार झाल्याच्या घटनांमध्ये सध्या वाढ होताना आपणास दिसते.

वय वेडं असतं असं म्हणतात पण आपण वेड होऊ नये हे महत्त्वाचं इंस्टाग्राम ओळख झाली आणि त्या व्यक्तीने भेटायला बोलावलं म्हणून भेटायला गेले आणि अत्याचार झाला अशा तक्रारी पोलीस ठाण्यामध्ये वारंवार होत आहेत तसेच तोच प्रकार फेसबुकबाबत सांगता येईल हे असं का घडतं याचा सर्वांनीच विचार करावा.

भाजी आणायला गेल्यावर साधी कोथिंबीर जुडी घेताना आपण पारखून घेतो तर असे मित्र जोडताना आपण पडताळणी, खात्री का नाही करून घेत. इंटरनेटची दुनिया ही आभासी जग आहे त्यात प्रत्येक व्यक्ती खरी माहिती देईलच याची खात्री नाही त्यातही गुन्हेगारी वृत्ती असणारे तर दंडुका खाल्ल्याशिवाय खरं बोलत नाही मग ते या आभासी जगात खरी माहिती देणारच नाही त्यामुळे आपण सतर्क रहाणे हाच चांगला मार्ग आहे.

चित्रपटातलं ते गाणं आठवतच असेल की 'लाख छुपाओ छुप ना सकेगा असली नकली चेहरा' अर्थात मनातले भाव चेहऱ्यावर उमटल्याशिवाय राहत नाहीत. आभासी जगात तर सारं 'छुपाने' ची अर्थात लपवायची पूर्ण मुभा आहे. इथं कुणी आधार कार्डच्या आधारे आपलं खातं उघडत नाही त्यामुळे पावला पावलावर फसवणुकीचा धोका असतो.

वाढती सायबर गुन्हेगारी लक्षात घेऊन आता देशात सायबर गुन्ह्यांची नोंद सुरू झाली आहे सोबतच महाराष्ट्र पोलिसांनी स्वतंत्र सायबर पोलीस ठाणे देखील प्रत्येक जिल्ह्यात सुरू केलेले आहे. सायबर गुन्ह्यांचा शोध घेण्याचे विशेष प्रशिक्षण पोलिसांना देत आहे अर्थात हा गुन्हा नोंदवल्यावर आपण सतर्क राहिलो तर गुन्हा घडणार नाही हे महत्त्वाचं.सायबर गुन्ह्याची वाढ अतिशय धक्कादायक आहे. आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात अनेक प्रकरणी पैसे परत मिळविण्यात पोलिसांना यश आले आहे.सायबर गुन्ह्याची तक्रार आपल्याला सायबर पोलीस ठाण्यात करता येते तसेच राष्ट्रीय सायबर गुन्हा नोंदणी पोर्टलवर देखील आपण घरबसल्या तक्रार नोंदवू शकता हीींिः// लूलशीलीळाश.सीें.ळप हा त्या पोर्टलचा पत्ता आहे. सायबर गुन्ह्याचा तपास करण्यात मदत होईल अशी अद्ययावत नॅशनल सायबर फॉरेन्सीक लॅब (तपास) दिल्लीत सुरू करण्यात आलेली



आहे.देशपातळीवर जुलै २०२४ पर्यंत ७.५ (साडेसात) लाख तक्रारी प्राप्त झाल्या या सर्वाधिक तक्रारी आर्थिक फसवणुकीच्या होत्या.आपण लक्षात ठेवा सायबर गुन्हे आपणास १९३० या टोल फ्री क्रमांक वर देखील नोंदवता येतील पण तक्रार करायची वेळच येऊ नये हे उत्तम.

(प्रशांत विजया अनंत दैठणकर)

## रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या खात्यात २ हजार ८५६ कोटी रुपये जमा

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यातील रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या बँक खात्यामध्ये सन २०२४- २५ मध्ये २ हजार ८५६.३० कोटी रुपयांचा निधी जमा करण्यात आल्याची माहिती रोजगार हमी योजना विभागाकडून देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत १०० दिवसांपर्यंतची मजुरी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीमधून दिली जाते. तर १०० दिवसांच्या वरील मजुरी राज्य शासनाच्या निधीतून दिली जाते. त्यानुसार सन २०२४-२५ मध्ये १०० दिवसांपर्यंत मजुरीचे २ हजार ६१६.३० कोटी निधी आणि १०० दिवसांवरील मजुरीचे २४० कोटी रुपये असा एकूण २ हजार ८५६.३० कोटी निधी मजुरांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आला आहे.केंद्र व राज्य शासनाकडून सन २०२४-२५ मध्ये अनुक्रमे ६६.२१ कोटी व ५.८८ कोटी रुपये असा एकूण ७२.०९ कोटी इतका निधी मजुरीपोटी पालघर जिल्ह्यातील मजुरांच्या खात्यात जमा करण्यात आला असल्याची महितीही 'रोहयो' विभागाने दिली आहे.

## आलुर येथे श्री गणेश पुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा ,अखंड हरिनाम सप्ताह, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन

धर्माबाद ।प्रतिनिधी

धर्माबाद तालुक्यातील मौजे आलुर येथे श्री गणेश पुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा ,अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण , श्री गणेश पुराण कथाकार ह.भ.प. जयंत महाराज नांदेडकर संभाजीनगर यांचे प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दैनिक कार्यक्रम पुढीलप्रमाणे २० /१२ /२०२४ रोज शुक्रवार ते २७/ १२ /२०२४ रोज शुक्रवार पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. दैनिक कार्यक्रम पहाटे चार ते सहा काकडा आरती, श्री ज्ञानेश्वरी पारायण सकाळी सात ते दहा गाथा भजन साडेदहा ते अकरा श्री गणेश पुराण कथा दुपारी १२ ते साडेचार पर्यंत सायंकाळी साडेपाच ते सात पर्यंत हरिपाठ रात्री साडेआठ ते साडेदहापर्यंत किर्तन तथा २०/१२/२०२४ रोजी किर्तनकार महाराज ह.भ.प. विकास महाराज धसवाडीकर, २१/१२/२०२४ रोजी किर्तनकार महाराज ह.भ.प.मोहनराव कावडे गुरुजी हासनाळीकर, २२/१२/२०२४ रोजी कीर्तनकार महाराज ह.भ.प. कृष्णा महाराज राजूरकर, २३/१२/२०२४ रोजी किर्तनकार महाराज ह.भ.प.अजय पांडे महाज नाळेश्वर,२४/१२/२०२४ रोजी किर्तनकार महाराज ह.भ.प. माधव गुरुजी वडगावे पांगरीकर, २५/१२/२०२४ रोजी किर्तनकार महाराज ह.भ.प. प्रतीक्षाताई निवलीकर, २६/१२/२०२४ रोजी ह.भ.प. तुकाराम महाराज मंडगीकर, २७/१२/२०२४ रोजी ह.भ.प. तुकाराम महाराज मंडगीकर यांचे काल्याचे किर्तन , इत्यादी कीर्तनकार महाराज यांचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. गायनाचार्य : श्री बंडू गुरुजी पांगरीकर, श्री जीवन पाटील रत्नाळीकर ,श्री विठ्ठल पाटील जवळा. काकडा /भजन : श्री गंगाधर महाराज बोरगाव, श्री मनोहर मामा शिंगनगावकर, श्री विठ्ठल महाराज समराळा, श्री नारायण महाराज बोधडी,मृदाचार्य: श्री माधव गुरुजी वडगावे, श्री लक्ष्मण महाराज तळेगाव, श्री विकास महाराज भावडे, श्री गणेश महाराज पाटोदा, श्री जनार्दन महाराज पाटोदा, वरील सर्व कार्यक्रमाचे आयोजन समस्त गावकरी मंडळी आलूरकर यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राज्य महामार्ग जिंतूर जालना हायवे वर पथदिवे बसवण्यात यावेत

### नगरसेविका सौ यमुना शेषनारायण दवणे यांची निवेदनाद्वारे प्रशासनास मागणी

मंठा ।प्रतिनिधी

मंठा शहरा लगत जाणारा राज्य महामार्ग क्रमांक ७५२/१ जिंतूर जालना हायवेवर पथदिवे व गतिरोधक बसवण्यात यावेत अशा प्रकारच्या यांनी अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन नगरसेविका सौ. यमुना शेषनारायण दवणे यांनी प्रशासनास आज दिले असून त्यांनी खालील निवेदनात नमूद केले आहे की, राज्य महामार्ग जिंतूर जालना या रोडचे रुंदीकरण होऊन जवळपास एक ते दीड वर्षे पूर्ण झाले आहे ,राज्य महामार्ग जिंतूर जालना या रोडचे रुंदीकरण होऊन जवळपास एक ते दीड वर्ष पूर्ण झाले आहे.

सदरील रोडवर केवळ शोभेचे खांब उभे केलेले आहेत परंतु त्यावरील पथदिवे चालू नाहीत या रोडवर एकही गतिरोधक नाही त्यामुळे एका वर्षामध्ये तब्बल १४१ निष्पाप नागरिकांचा बळी या रोडने घेतलेला आहे ,या रोडवरील पथदिवे चालू करून गतिरोधक बसवण्यात आले असते तर निश्चितच अपघाताचे प्रमाण कमी झाले असते. रोडवरील पथदिवे चालू करून गतिरोधक बसवणे या मागणी करिता नगरपंचायत कार्यालय व सार्वजनिक बांधकाम कार्यालय या दोनही कार्यालयाकडूनयापूर्वी अनेक वेळा अनेक नागरिकांनी मागणी केलेली आहे परंतु या दोन्ही कार्यालयाने अद्यापही एकही



एका वर्षामध्ये तब्बल १४१निष्पाप नागरिकांचे बळी

काम पूर्ण केलेले नाही.या १४१ निष्पाप नागरिकांच्या मरणास हे दोन कार्यालय जबाबदार आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की दोन दिवसापूर्वी विविध वर्तमानपत्रांमध्ये या महामार्गाबाबत नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार बांधवांनी केले होते त्या नंतर वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये रस्ते अपघात आटोक्यात आणण्याकरिता आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचे काम पत्रकारांनी सुद्धा केले होते त्यानंतर सुद्धा बुधवार रोजी वृत्तपत्रात बातमी येते ना येतेच की, १३९निष्पाप नागरिकांचा या मृत्यू मृत्यू झाला होता त्या नंतर आज पर्यंत १४१ अपघातग्रस्तांची संख्या वाढली असून सदरील राज्य महामार्गावर गतिरोधक व पथदिवे बसवून प्रशासनाने ठोस पाऊल उचलावे व आपल्या स्तरावरून आदेशित करावेत अशी मागणी मंठा तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार काळदाते साहेब व जालना येथील जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपंचायतचे प्रभारी मुख्याधिकारी इंगोले साहेब यांना नगरसेविका सौ.यमुना शेषनारायण दवणे यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधत मागणी करण्यात आली.

पान १ वरून...

**पेठ बीड हद्दीत गावठी..**

नाही या सर्व गोष्टींचा पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी विचार करुन त्यांनी पोउपनि सिध्देश्वर मुरकूटे व पथकाने योग्य ती खबरदारी घेवुन बातमी ठिकाणी सापळा लावयाला सांगितले. पोउपनि सिध्देश्वर मुरकूटे, पोउपनि विघ्ने व पथकाने सापळा लावून आरोपीवर झडप टाकली असता आरोपी पळुन जात असतांना त्यांचा पाठलाग करून एकास पकडले व दुसरा ऊसाचे शेतात पळाला तेव्हा त्याचा ऊसाचे शेतात पाठलाग करून पकडून त्याब्यात घेतले आहे. आरोपी अक्षय आठवले व मनिष क्षीरसागर यांना पकडल्यानंतर त्यांचेकडुन गुन्हयांचा सर्व घटनाक्रम समजला त्यात त्यांचे सोबत ओमकार सवई गुन्हयात सामील असल्याची माहिती मिळाल्याने लगेच त्वरीत मध्यरात्री ओमकार सवई यास बीड येथुन पकडले. सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोलीस निरीक्षक उस्मान शेख हे करीत आहेत.

सदरची कामगिरी अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि उस्मान शेख स्था.गु.शा.बीड, पोउपनि सिध्देश्वर मुरकूटे, पोउपनि महेश विघ्ने, पोह/मनोज वाघ, राहुल शिंदे, पोना/विकास वाघमारे, अश्विनकुमार सुरवसे, चालक राऊत यांनी मिळुन केली आहे. या केलेल्या कामगिरीसाठी पोलीस अधीक्षक मां श्री अविनाश बारगळ यांनी पन्नास हजार ५००००/ - रू. बक्षीस जाहीर केले आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर...**

यावेळी बोलताना वरेकर व सातपुते म्हणाले की, ज्या महामानवाने भारत देशाची घटना लिहिली त्याच घटनेवर आपला देश चालत आहे व सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय देण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले त्या महामानवाला हिणवणयाचे काम अमित शहा यांनी केले आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याचा राजीनामा घेतला पाहिजे. संसदेत अमित शहा यांनी जाहीर माफी मागितली पाहिजे अशी मागणी बीड जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. हि मागणी मान्य न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले , उपजिल्हाप्रमुख आदिनाथ खेडकर , जिल्हासंघटक नितिन धांडे, जिल्हासहसचिव श्रीकृष्ण गायके ,बीड तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , आष्टी तालुकाप्रमुख सुभाष राऊत , शिरूर तालुकाप्रमुख सोपानकाका मोरे , अल्पसंख्याकचे जिल्हा संघटक सय्यद नयुमभाई , कामगार नेते रविअणणा वाघमारे,महिला आघाडीच्या बीड विधानसभा संघटक मीराताई नवले, उपतालुकाप्रमुख प्रकाश धुताडमल , तालुका संघटक विशाल सोनवणे ,सयुवासेनेचे उपजिल्हाधिकारी ऋषीराज गिरी , युवासेनेचे बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले , युवा अधिकारी शिरूर साईनाथ ढाकणे , युवा अधिकारी वडवणी नवनाथ मोरे , युवा अधिकारी आष्टी शिवप्रसाद जाधव ,सर्कलप्रमुख रमेश नवले , गटप्रमुख रामदास मोहिते,माजी सरपंच सखाराम मोहिते ,विनोद गुंड पाटील, भिमराव कुटे ,अजय गायकवाड, दत्ता सुरवसे ,बाबु कुटे , राहुल काळे ,अक्षय काळे , अभिजित चिंजकर ,यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुप्टाचे क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ घोषित

### पुरस्कार वितरण सोहळा २९ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न होणार

**बीड ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र अंडर प्रिव्हिलेज्ड टीचर्स असोसिएशनच्या (मुप्टा) वतीने देण्यात येणाऱ्या सन २०२४ च्या क्रांतीबा ज्योतिबा फुले राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराची घोषणा जाहीर करण्यात आली असून बीड जिल्हा मुप्टाचे जिल्हाध्यक्ष मा. प्रा. प्रदीप रोडे यांच्या अध्यक्षतेखाली तुलसी इंग्लिश स्कूल, संत ज्ञानेश्वर नगर, बीड.येथे बैठक संपन्न झाली. बीड जिल्हा मुप्टाच्या वतीने क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त सर्व समावेशक कृतिशील कर्तृत्व करणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव करण्यात येतो. प्रति वर्षी प्रमाणे यावर्षी चे पुरस्कार वितरणाचे १६ वे वर्ष आहे असे पुरस्कार वितरण सोहळ्याचे मुख्य संयोजक व बीड जिल्हा मुप्टाचे अध्यक्ष, प्रा. प्रदीप रोडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.**

शिक्षक प्राध्यापकांच्या न्याय हक्कासाठी लढणारी एकमेव लढाऊ संघटना म्हणून मुप्टाने आपली ओळख निर्माण केलेली आहे. तसेच सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून संघटनेने सामाजिक बांधिलकी जोपासलेली आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे या संदर्भात त्यांना हवे त्या मदतीचे कार्य करून जणूकाही शैक्षणिक नवक्रांती करण्याचे कार्य मागील अनेक वर्षापासून बीड जिल्हा मुप्टा करते आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी क्रांतीबा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून बीड जिल्हा मुप्टाच्या वतीने सलग १६ व्या वर्षी शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड. येथे सकाळी ठीक १० वाजता संपन्न होणार आहे.

पुरस्कारार्थी- १. प्रा. डॉ. प्रतिभा जाधव, (आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, लासलगाव,जिल्हा नाशिक.) २. प्राचार्य भास्कर पाटील,( सुधाकरराव नाईक महाविद्यालय, अकोला.) ३. श्रीमती कीर्तीताई श्रीधरराव पांगरकर (साळुंके), (विनायक प्राथमिक विद्यालय, बीड.) ४. आयु. राहुल कांबळे, (युसुफ वडगाव हायस्कूल, युसुफ वडगाव, ता. केज जि. बीड.) ५. आयु. जालिंदर ठवरे, (जि. प. प्राथमिक शाळा,रेवकी ता.गेवराई जि. बीड.) ६. आयु. संजय कांबळे, (लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतुर, जि. जालना.) ७. प्राचार्य,संघमित्रा गोणारकर, (सावित्रीबाई फुले महिला बी.एड. कॉलेज,नांदेड.) ८. श्रीमती भावसार अश्विनी रामराव, ( जि. प. प्राथमिक शाळा वाणीसंगम, जि. परभणी.) ९. आयु. वडमारे सचिन, (भगवान विद्यालय,बीड.) १०. आयु. गायकवाड दादासाहेब, (विवेकानंद विद्यालय,केज. जि. बीड.) ११. आयु. शामसुंदर बगाटे, (जि. प. प्राथमिक शाळा,लोणी, जि. परभणी.) १२. आयु.भादवे सुभाष, ( जि. प. प्राथमिक शाळा, केरूळ, ता. आष्टी जि. बीड.) १३. श्रीमती रेणुका मुक्ताराम दोडके, (जि. प. प्राथमिक शाळा, थेरला, ता. पाटोदा जि. बीड.) १४. प्रा. डॉ. अनिता शिंदे, ( सौ.के. एस. के. महाविद्यालय, बीड.) १५. आयु. गणेश मैंद, (विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय, जोडबोडसर, जि.छ. संभाजीनगर.) १६. हेमलता सुनील गजबे,( एम.एस.सी. नर्सिंग कॉलेज,जे.जे.हॉस्पिटल, मुंबई.)तरी या पुरस्कार सोहळ्यासाठी शिक्षणप्रेमी आणि समाजातील सर्वच घटकांनी व पुरस्कार प्राप्त शिक्षकांनी सहकुटुंब उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हा मुप्टा संयोजन समिती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# परतुर येथे मंजूर करण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयाची ६० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता प्रदान करा

## आमदार बबनराव लोणीकर यांची औचित्याच्या मुद्याद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

जालना ।प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत परतुर व मंठा या दोन्ही तालुक्यांमध्ये उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. परतुर व मंठा हे दोन्ही शहरे शेगाव- पंढरपूर व छत्रपती संभाजीनगर - नांदेड या दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडलेले आहेत तर मुंबई - नांदेड या ब्रॉडगेज रेल्वे मार्ग देखील परतुर या शहरातून जातो. त्यामुळे या ठिकाणी अपघातांचे प्रमाण जास्त आहे. परतुर - मंठा या दोन्ही तालुक्यातील गावे जालना या जिल्ह्याच्या ठिकाणापासून जवळपास ७५-१०० किलोमीटर पेक्षा अधिक अंतरावर आहे त्यामुळे रुग्णांना सेवा देण्यासाठी मोठा अडथळा निर्माण होतो. त्यामुळे या



दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्याची मागणी वारंवार आमदार बबनराव लोणीकर यांच्या वतीने करण्यात आले होती.

नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनादरम्यान औचित्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार बबनराव लोणीकर विधानसभेत म्हणाले की, दि.२४ नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयाप्रमाणे परतूर येथील उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी देण्यात आली असून परतुर येथे १०० खाटांचे भव्य उपजिल्हा रुग्णालय प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थाने उभारले जाणार आहेत त्यासाठी अंदाजे ६० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित असून या ६० कोटी रु ची प्रशासकीय मान्यता तात्काळ देण्यात यावी.

केंद्र सरकारच्या माध्यमातून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मे २०२४ मध्ये परतुर तालुक्यातील आष्टी व वाटुर आणि मंठा तालुक्यातील ढोकसाळ व दहिफळ खंदारे या ४ ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रास प्रत्येकी ०१ कोटी ४३ लक्ष रुपयांची मंजुरी मिळालेली आहे. परंतु या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थाने यासाठी प्रत्येकी १० कोटी रुपयांची आवश्यकता आहे त्यानुसार वरील चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांना प्रशासकीय इमारत व कर्मचारी निवासस्थानंकरिता प्रत्येकी १० कोटी रुपये प्रमाणे ४० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यासह निधी वितरीत करण्यात यावा. अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधिमंडळात केली.

# लोणार भायगाव येथे बिबट्याच्या हल्यात वासराचा मृत्यु

रोहिलागड ।प्रतिनिधी

लोणार भायगाव तालुका अंबड येथे आज रोजी १९ डिसेंबर २०२४ पहाटे तीन ते चार दरम्यान बिबट्या या वन्यप्राण्याने गाय चे वासरू यावर हल्ला केला या मध्ये गाईचे वासरू मृत पावले आहे, सदरील हंगामा हा ऊस तोडीचा असल्यामुळे वन्यप्राणी बिबट्या हा फिरतीच्या प्रवासावर आहे, तरी सदरील अंबड तालुक्यातील व लोणार भायगाव परिसरातील ग्रामस्थांनी शेतामध्ये कामे करत असताना ग्रुपने काम करावे, मोठ मोठ्याने गाणे म्हणत किंवा मोबाईलचे आवाज जास्त ठेवून शेतातील कामे पार पाडावेत, अंबड तालुक्यातील व लोणार भायगाव परिसरातील ग्रामस्थांनी पुढील काही महिने सतर्कतेने शेतामधील कामे करावे असे आव्हान बी एम पाटील वन परिमंडळ अधिकारी अंबड) व व्ही एम दौंड वनपरिक्षेत्र अधिकारी जालना



दक्षिण यांनी केले आहे. या वेळी एस एस ढाकणे (पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय) कर्जत ता अंबड जि जालना डॉ प्रणीता पशुधन विकास अधिकारी जामखेड गणेश घुगे विशाल बुनगें (वनपाल)संरपच गोविंद जाधव लक्ष्यण माने गणपत भागवत सह आनेक शेतकरी या वेळी उपस्थित होते.या वेळी संबंधित अधिकारी यांनी पंच नामा करून सदर वासराला खड्डा करून पुरले सदर बीबट्या मुळे गावात भीतीचे वातावरण पसरले आहे या वेळी संरपच गोविंद जाधव यांनी वन परिमंडळ अधिकारी बी एम पाटील व वन परिक्षेत्र अधिकारी व्हि एम दौंड यांना सांगीतले की तुमच्या मार्फत या परिसरात पींजरा लाऊन आपन त्या कडे लक्ष ठेवाव



# सरपंच संतोष देशमुख हत्याकांड

# वंचितकडून कुटुंबीयांचे सांत्वन

### वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट

बीड।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे नऊ डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. आज वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र केंद्रीय व प्रदेश पदाधिकारी यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच वंचित बहुजन आघाडी आपल्या पाठीशी असल्याचे सांगितले याप्रसंगी राज्याचे नेते व जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेसंदर्भात आ.विजयसिंह पंडित यांची तक्रार

नागपूर ।प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ व ६१ या दोन्ही महामार्गाची अत्यंत दुरावस्था झाली आहे. महामार्गावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे, खचलेले रस्ते यामुळे वाहनाचे अपघात होवून होत असलेली जीवीतहानी याबाबतचे गांभीर्य लक्षात घेवून आ.विजयसिंह पंडित यांनी महामार्गाच्या देखभाल, दुरुस्ती आणि डागडुजीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे. या बाबत तात्काळ कार्यवाही न झाल्यास केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री ना.नितीन गडकरी यांना बोलणार असल्याचे आ.पंडित यांनी सांगितले आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघातून सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ आणि कल्याण-विशाखापट्टनम राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ हे दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. या महामार्गावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले आहेत, महामार्गाची वेळेवर देखभाल आणि दुरुस्ती होत नसल्यामुळे अनेक ठिकाणी माती खचून अक्षरशः गतीरोधकाप्रमाणे महामार्गाची अवस्था झालेली दिसून येते. अनेक ठिकाणी महामार्गाच्या दुरावस्थेमुळे रस्ते अपघात होवून प्रवाशांना जीव गमावण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. महामार्गावर वाहन धारकांकडून टोल वसुली होत असतानाही रस्त्याची दुरावस्था का ? असा सवाल उपस्थित करून गेवराई विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी या बाबत लेखी तक्रार संबंधितांकडे केली



आहे.

महाराष्ट्र विधीमंडळ अधिवेशनाच्या निमित्ताने नागपूर येथे असताना आ.विजयसिंह पंडित यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्प संचालकांना लेखी पत्र देवून सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थे बाबत तक्रार केली आहे. बीड ते शहागड दरम्यान शंभराहून अधिक ठिकाणी महामार्गाचा मोठा भाग खचलेला असून रस्त्यावर गतिरोधकासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्त्याचे फलक गायब आहेत, पथदिव्यांचे खांब कोलमडलेल्या अवस्थेत आहेत, ओव्हरब्रीजला ज्याठिकाणी सर्व्हिस रोड जोडला जातो तेथे मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहन धारकांना त्रास सहन करावा लागतो, महामार्गावर दररोज अपघात होत असल्यामुळे वाहन धारक त्रस्त झाल्याचेही त्यांनी तक्रारीत नमुद केले आहे.

कल्याण-विशाखापट्टनम राष्ट्रीय महामार्ग ६१ बाबत आ.विजयसिंह पंडित यांनी रस्ते वाहतुक मंत्रालयाच्या नवी मुंबई स्थित मुख्य अभियंत्यांकडे लेखी तक्रार नोंदविली आहे. सिरसदेवी येथे पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे महामार्गाला पावसाळ्यात तलावाचे रुप येते, ऐन रस्त्याच्या मध्यभागी मोठे खड्डे पडलेले असल्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. तिंतरवणी ते सावरगाव दरम्यान रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असून रस्त्याची वेळेवर डागडुजी न झाल्यामुळे अनेकांचे प्राण गेल्याचेही त्यांनी तक्रारीत नमुद केले आहे. या सर्व प्रकाराला आपला विभाग जबाबदार असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. तक्रारीची वेळेवर दखल न घेतल्यास केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांच्याशी आपण बोलणार असल्याचे त्यांनी सांगितले. आ.पंडित यांनी महामार्गाच्या दुरावस्थेकडे लक्ष केंद्रीत केल्यामुळे

# भागीदारीच्या वादातून महिलेची आर्थिक फसवणूक

संगमनेर खुर्द ।प्रतिनिधी

संगमनेर तालुक्यातील निमगाव पागा येथील रमेश सोमनाथ कानवडे यांनी जुन्नर तालुक्यातील आळेफाटा या ठिकाणी माऊली कृषी सेवा केंद्र सुरू केले यामध्ये त्यांनी व्यवसाय मोठा करण्यासाठी प्रवीण सुरेश महाले व रेखा सुरेश महाले रा.दो. रा. ब्राह्मणवाडा रोड, ता. जुन्नर, जि. पुणे यांना आपल्या व्यवसायात भागीदार करून घेतले. व्यवसाय मोठा झाला. परंतु काही दिवसानंतर रमेश सोमनाथ कानवडे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. आता सर्व जबाबदारी रमेश कानवडे यांच्या पत्नी स्वाती कानवडे या दुःखातून सावरत त्या स्वतः व्यवसायात भागीदार झाल्या. आपला व्यवसाय चालला पाहिजे व आपल्या मुलांचे शिक्षण झाले पाहिजे यासाठी मयत रमेश कानवडे यांच्या पत्नी स्वाती कानवडे, रेखा प्रविण महाले व प्रवीण सुरेश महाले यांनी एक वर्ष माऊली कृषी सेवा केंद्र भागीदारीत सुरु केले.

परंतु एक वर्षानंतर कौटुंबिक अडचणी व प्रवीण सुरेश महाले यांचे सदर फार्मच्या व्यवहाराबाबत शंकास्पद वागणे लक्षात आल्याने दि.२३/१२/२०२०लेखी दास्ता द्वारे सर्व कायदेशीर रित्या स्वाती रमेश कानवडे यांनी निवृत्ती घेऊन सदर फार्मच्या भागीदारीमध्ये कोणत्याही आर्थिक थकबाकी मध्ये थकीत रकमेस व कर्जास सदर फार्मचे थकबाकी नसताना दि.२३/१२/२०२०पूर्वीचे पूर्वीचे व त्यानंतरचे कोणतेही येणे अगर देणे रकमेस स्वाती रमेश कानवडे या जबाबदार असणार नाही,याची कल्पना देखील सदर प्रवीण महाले व त्यांच्या पत्नी रेखा महाले यांना दिली असताना देखील संगनमताने माऊली कृषी सेवा केंद्रचे आय डी बीआय बँक शाखा आळेफाटा ता. जुन्नर या शाखेत महाले यांनी लपवून ठेवलेले कोरे चेक स्वाती कानवडे यांना कोणतीही कल्पना न देता बेकायदेशीरित्या कोणाचेही देणेघेणे नसताना सदर फार्मचे देणे पोटी वापरले त्यामुळे बेकायदेशीर रित्या कोणतेही देणे घेणे नसताना स्वाती रमेश कानवडे यांना हेरंब इंडस्ट्रीज लिमिटेड, बोरवली,मुंबई ९२ या कोर्टाची इतरत्र चरनक्षम दस्ताऐवज क्र.१३८ दाखल केलेल्या केसेसांना सामोरे जावे लागेल आहे.

सर्व आर्थिक व्यवहार संपुष्टात आले असताना देखील, कोणाचे देणे घेणे नसताना देखील स्वाती कानवडे यांना प्रचंड मानसिक, व आर्थिक संकट ओढवल्याने त्यांची फसवणूक मोठी आर्थिक झाली आहे. या संदर्भाची व वकिरा मार्फत नोटीस बँकेला व इतर कोणत्याही कंपनीला त्यापुढील काळात माझे नावे चेक, आर्थिक देवाण-घेवांना नसताना बेकायदेशीर रित्या वापरल्यास अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे नोटीसीत नमूद करण्यात आले आहे.संबंधित बँकेला व कंपनीला वकिलामार्फत नोटीस पाठवण्यात आली आहे.



बीड: संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या स्मृतिदिना निमित्त शुक्रवार (२० डिसेंबर) रोजी बीड येथील महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. सकाळी ९ वाजता शहरातील संत गाडेबाबा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी अभिवादन ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते.



# कर्मयोगी गाडगेबाबांचे विचार घेऊन विद्यार्थ्यांनी कृतीशील व्हावे -डॉ. हनुमंत सौदागर

## भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात संत गाडगेबाबा स्मृतीदिन साजरा

केज/प्रतिनिधी

संत गाडगेबाबांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत.विचारातून कृतिशीलता जपावी असे मत डॉ.हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते केज शहरातील भाऊसाहेब पाटीलअध्यापक(बी एड) महाविद्यालयात संतगाडगे महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमात अध्यक्षम्हणून बोलत होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.हनुमंत सौदागर,प्रमुख पाहुणे प्राचार्य विजय शिनगारे, सरस्वती महाविद्यालया तील प्रा.डॉ.हरिदास शिंदे, प्रा.डॉ.संतोष मस्के, अशोक घोडके,भूगोल विभागप्रमुख प्रा.डॉ. नागेश कराळे विचारपीठा वर उपस्थित होते.प्रा. बलाढये यु.बी,प्रा.कचरे जे.एस,प्रा लुंगारे एस.आर प्रा.जगदाळे एम.एच,प्रा. चोले एन.जे,ग्रंथपाल संतोष साळवी सुजीत नाईकवाडे यांची होती

यावेळी बोलतांना डॉ. हनुमंत सौदागर म्हणाले संत गाडगेबाबा हे मानवतावादी संत होते जीवनभरात सेवेचा वसा घेऊन दिवसभर गावातील घाण साफ करून रात्री लोकांच्या डोक्यातील अंधश्रद्धेची घाण साफ करण्याचे कार्य त्यांनी केले.समाजसेवा सर्वश्रेष्ठ असल्याचा विचार त्यांनी दिला.त्यांच्या विचारातून देश घडत आहे असे मत व्यक्त केले.छात्र अध्यापिका वैशालीथोरात चैताली गायके,रुपाली देशमुख,निकिता मुंडे,नेहा मुंडे,वैशाली हजारे,यांनी विचार मांडले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरविंद गायसमुद्रे,सतीशनेहरकर, संजय गोसावी यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतल



केज ।प्रतिनिधी

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलकेंद्रीयगृहमंत्री अमित शहा यांनी बेताल वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेते आमदार सुनीलजी प्रभु,मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर, उपनेत्या सुषमाताईअंधारे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजाधव,लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील धांडे,सहसंपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली बीडजिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत केज येथे तालुका प्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली केज तहसील कार्यालय येथे निदर्शने करून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा अशी निवेदन देऊन मागणी करण्यात आली.यावेळी जिल्हा सचिव रोहित कसबे,शहरप्रमुख तात्या रोडे,युवासेना तालुका प्रमुख किशोर घुले,उप तालुकाप्रमुख सुरज वाघमारे,उपशहरप्रमुख पप्पू ढगे,दत्ता तांदळे, ज्ञानेश्वर बोबडे,अंगद देशमुख,वैजनाथ वाघमारे मधूकर अंधारे,आप्पा कांबळे,लहु केदार,मारुती गव्हाने,अमोल घुले, विश्वनाथ राऊत,अनिकेत शिंदे,कृष्णा केदार तसेच केज तालुक्यातील शिव सैनीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आज सहा कोटी मराठा समाज दैवत व सामाजिक क्षेत्रातील गुरू व दैवत मनोज दादा जरांगे पाटील यांनी आज पाटोदा येथे बाब तिपटे यांच्या निवास्थानी भेट दिली.व आरोग्याची काळजी घेयची सांगितली. दहा दिवसापूर्वी धनगर जवळका येथे बाबा तिपटे व कुटूबाचा मोटारसायकलवर अफघात झाला होता. समोरून मोटार सायकल वर तीन मुल भरधाव वेगाने फास्ट चुकीचा दिशेने आल्यामुळे झाला. नगर येथे न्यूरोन हॉस्पिटल येथे गुडघ्याच व तळपायाचे ऑफरेशन झाले व सोमवारी सुट्टी झाली.बाबा तिपटे यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठ मनोज दादा जरांगे पाटील यांनी पाटोदा येथे येऊन तिपटे ला धीर दिला.आज पर्यंत सामाजिक कामच चीज झाले.आसे बाबा तिपटे यांनी बोलून दाखवले



नि शब्द.....जाहीर निषेध......जनतेचा संयम सुटण्या आगोदर सर्व आरोपींना अटक करून शासनाने देशमुख कुटुबाला न्याय द्यावा.

मस्साजोग ता.केज येथील स्व. सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा दिली पाहिजे व परभणी येथील मृत्यू पावलेल्या युवकांच्या कुटुंबाला न्याय मिळावा.या मागणीसाठी गुरूवार दि.१९ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक पाटोदा ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पाटोदा या ठिकाणा पर्यंत लोकनेते आ.सुरेश धस आण्णा मित्रमंडळाच्या वतीने व समस्त पाटोदा नागरिकांच्या वतीने कॅन्डल मार्च काढुन निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी हजारो युवक व नागरीक सहभागी होते.

# बीड जिल्ह्यातील गुंडगिरी, दहशतवाद संपवण्याचा निर्धार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आ.सुरेश धस यांनी मानले आभार

आष्टी (प्रतिनिधी)

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणावर आमदार सुरेश धस यांनी सभागृहामध्ये जोरदार हल्लाबोल केल्यानंतर वस्तुस्थिती लक्षात आल्यामुळे बीड जिल्ह्यातील दहशतवाद गुंडगिरी आणि अवैध वाळू माफियांचे साम्राज्य उध्वस्त करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात व्यक्त केला त्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहामध्ये संतोष देशमुख हत्याप्रकरणी उत्तर देताना अत्यंत स्पष्टपणे सर्व घटनाक्रम सांगितला त्यामध्ये या प्रकरणातील संशयित सूत्रधार असलेल्या वाल्मिक कराड याचेवर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे त्याबद्दल कारवाई करण्यात येईल असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. तसेच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कडे सोपवण्यात येणार असून तपासामध्ये निष्पन्न होणारे आरोपी कोणतेही असो त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला आहे या प्रकरणी तसेच बीड जिल्ह्यातील गुंडगिरी आणि दहशतवाद वाटला असल्यामुळे तसेच स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणी दुर्लक्ष करण्यात आल्याचा ठपका ठेवून बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करण्यात येणार आहे असेही त्यांनी घोषित केले.

बीड जिल्ह्यामधील मस्साजोग येथील अवादा कंपनीच्या पवन ऊर्जा प्रकल्पातील अधिकाऱ्याला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी आणि धमकी दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला आहे त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणारच आहे. मात्र या हत्येप्रकरणी जर वाल्मिक कराडचा हात असेल, तर त्याच्यावर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई केली जाईल असे सांगत

बीडच्या मस्साजोगमधील प्रकरण अत्यंत गंभीर आहे. याप्रकरणाची पाळेमुळे खोदून जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारावी लागेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत बोलताना स्पष्ट केले आहे. या हत्याप्रकरणी मास्टरमाईंड कोणीही असला तरी सोडणार नाही, बीडमध्ये शांतता प्रस्थापित करु,असेही फडणवीसांनी सांगितले. बीडमध्ये गुन्हे करणाऱ्यांची पाळेमुळे खोदून काढू, संपूर्ण प्रकरणाची एसआयटी चौकशी करु संतोष देशमुखांच्या कुटुंबियांना १० लाखांची मदत करण्यात येणार असल्याची माहिती देखील यावेळी फडणवीसांनी दिली.त्यानंतर बोलताना माझ्या मागणीवर अत्यंत समर्पक उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले,त्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो, बीड जिल्ह्याला आयपीएस दर्जाचा अधिकारी द्यावा असे आ.सुरेश धस यांनी म्हटले आहे



# शहागड जि.प प्रशाला शालेय व्यवस्थापण समितीच्या अध्यक्षपदी अशफाक शाह तर उपाध्यक्षपदी भगवान माने यांची बिनविरोध निवड

शहागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यात शहागड जि. प. प्रशाला शाळेची दि. २० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता शाळा व्यवस्थापन समितीची निवडणुक पार पडली यात सर्व सदस्यानी अध्यक्षपदी अशफाक रहीम शेख यांची व उपाध्यक्षपदी भगवान नागू माने यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.शालेय व्यवस्थापण समितिच्या निवडणुकीत अमजद दाऊदखॉ पठाण,सत्यशीला हरिश्चंद्र धोत्रे,उजमा असलम कुरेशी,अख्तर आसेफ शेख,मीरा उद्धव मापारी,फरजाणा तय्यब फुलारी,बळीराम शेषराव मगरे,सलमा इमरान शेख,आरेफा अब्दुलबारी बागवान,भास्कर साहेबराव घोरपडे यांची सदस्य पदी निवड करण्यात आली या समितीच्या निवड प्रक्रीया शांततेत पार पडली व सर्व पालकाकडुन अभिनंदन करण्यात आले

# संतोष देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी - डॉ ज्योती मेटे

बीड ।प्रतिनिधी

मस्साजोग येथील तरुण सरपंच संतोष देशमुख यांच्या प्रकरणांमध्ये राज्याचे मा. मुख्यमंत्री यांनी सदनांमध्ये उत्तर देत असताना संबंधित आरोपी विरुद्ध मोक्का लावण्याची केलेली घोषणा तसेच एसआयटी व न्यायालयीन चौकशीची केलेली घोषणा महाराष्ट्राच्या गृहमंत्री या नात्याने त्यांच्या संवेदनशीलतेचे प्रतिक आहे. कुटुंबीयांना त्यांनी आर्थिक मदत देखील जाहीर केलेली आहे. याकरिता राज्याच्या मुख्यमंत्र्याचे मनःपूर्वक आभार व्यक्त करत शिवसंग्राम अध्यक्ष



डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी संतोष देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारने उचलावी अशी मागणी थेट मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

संतोष देशमुख यांच्या निधनानंतर देशमुख कुटुंबियांचा करता आणि कमविता घरातील व्यक्ती गेला आहे त्यामुळे या कुटुंबाच्या पुढील जीवनात अनेक अडचणी निर्माण होणार आहेत देशमुख कुटुंब पूर्णपणे संतोष देशमुख यांच्यावर अवलंबून होते त्यांच्या जाण्याने आता त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न देखील उभा राहिला आहे. त्यामळे संतोष देशमुख यांच्या मुलांचे शैक्षणिक खर्चासाठी तरतुदी करिता शासनाकडून विशेष बाब म्हणून त्यांचे शैक्षणिक शुल्क अदा करणे तसेच अनुषंगिक खर्च देण्याबाबत विचार करण्यात यावा अशी मागणी

# महाराष्ट्र शासनाच्या वतीने आम्रपाली साबळे उत्कृष्ट अभिनयासाठी सन्मानित

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने ६३ वी महाराष्ट्र राज्य हौशी नाट्य स्पर्धा मोठ्या उत्साहात संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाने पार पडली,राज्य नाट्य स्पर्धेत बीड व संभाजी नगर केंद्रावर बीड जिल्हा ,धाराशिव जिल्हा ,जालना जिल्हा आणि संभाजी नगर जिल्हा मिळून असे एक केंद्रात साधरील स्पर्धा दिनांक २५ नोव्हेंबर ते १२ डिसेंबर क्या दरम्यान अतिशय आनंदी व जल्लोषात पार पडली आहे .सदरील स्पर्धेत चार जिल्ह्यातून एकूण सोळा नाटके सादर झाली आहेत ,त्यात बीड येथील न्यू प्रगती महिला सेवा भावी संस्था च्या वतीने डॉ. आरुण जऱ्हाड लिखित व प्राध्यापक विनोद दळवी दिग्दर्शित द अँनॉमली हे नाटक सादर करण्यात आले होते

सदरील नाटकाने रसिक मायबाप प्रेक्षकाची मने जिंकल्या मुळे रसिक प्रेक्षकांनी नाटकास टाळ्यांच्या गजरात नाट्य गृहातील सर्व प्रेक्षक नाटकाशी एकरूप होऊन नाटकातील कलाकारांच्या सादरीकरणाला दाद देत होते. सदरील नाटकात आम्रपाली साबळे यांनी सुचिता नावाची आईची भूमिका साकारली होती,आम्रपाली यांनी रंगमंचावर सुचिता ची भूमिका साकारत असताना प्रेक्षा गृहातील प्रेक्षकांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते व टाळ्यांचा गजर नाट्य गृहात दुमदुमला होता ,त्यामुळे आम्रपाली साबळे यांना ६३ वी हौशी मराठी नाट्य स्पर्धेतील उत्कृष्ट



अभिनयासाठी विशेष गुणवत्ता प्रमाण पात्र देवून सन्मानित करण्यात आलं.सदरील नाटकाचे लेखन डॉ. आरुण जऱ्हाड यांनी केले असून नाटकाचे दिग्दर्शन विनोद दळवी यांनी केलेले आहे.

या नाटकात सोनल टाक यांनी नर्स १ ची भूमिका तर दादासाहेब नवघरे यांनी डॉक्टर ची भूमिका सावन गिल यांनी सुधीर , आई - सुनीता नागरगोजे ,बाबा- श्याम टल्ले, बाल कलाकार बेबी एक च्या भूमिकेत कुमारी प्रांजल टाक, बेबी दोन - कुं. श्वेता औसरमोल,बेबी तीन कुमारी कीर्ती शिंदे, जावई - निखिल इच्के, सासू - हिरे मॅडम , सलमान - आमोल गायकवाड, इम्रान - आशोक घुळे, महिला पोलिस - सारिका गायकवाड, इन्स्पेक्टर - राजेंद्र जोसेफ यांनी उत्कृष भूमिका साकारून बीड च्या नाट्य प्रेमी रसिक प्रेक्षकांच्या मनावर आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे.

सदरील नाटकाची तांत्रिक बाजू मधे नाटकासाठी चें संगीत संयोजन राहुल साळवे आणि चिरंजीव सत्यम दळवी यांनी पाहिले तर प्रकाश योजना अशोक घोलप यांनी केली ,रंगभूषा ड. वर्षा वेशभूषा ड मनीषा दळवी , नाटकाचे दृशबंध रितेश यादव आणि आदित्य दोडके यांनी केले.या नाटकाचे सूत्रधार बाबासाहेब सोनवणे व सचिन साबळे यांनी काम पाहिले. तर पत्रकार जितेंद्र शिरसाठ यांचे मोलाचे मार्गदर्शन नाटकासाठी झाले ,आम्रपाली साबळे यांना अभिनयाचे विशेष प्रमाणपत्र मिळाल्यामुळे सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे मुख्य सचिव श्री विकास खरगे साहेब, आखिल भारतीय नाट्य परिषदेच्या बीड जिल्हा अध्यक्ष , बाल रंगभूमी मध्यवरती संघटनेच्या उपाध्यक्ष तथा साहित्य परिषदेच्या डॉक्टर दीपा ताई क्षीरसागर , अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे जिल्हा वेवस्थापक प्रमोद रामदासी तसेच नाटकाचे लेखक डॉक्टर आरूण जऱ्हाड,नाट्य लेखक दिग्दर्शक विनोद डावरे व द अँनोमाली नाटकाचे दिग्दर्शक प्रा.विनोद दळवी व बीड जिल्ह्यातील सर्व नाट्यकर्मी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

# संत गाडगेबाबा स्मृती दिनानिमित्त गाडगेबाबा चौकात गाडगेबाबाना अभिवादन

लातूर ।प्रतिनिधी

दिनांक २० डिसेंबर रोजी येथील संत गाडगेबाबा चौकात थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या स्मृती दिनानिमित्त संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस लातूर शहर महानगरपालिका माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार,माजी नगरसेवक आनंत गायकवाड ,लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे , सचिव बाबासाहेब बनसोडेयांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करून संत गाडगेबाबा चौक फलकाचे अनावरण करण्यात आले.

या वेळी प्रस्तविकात प्रा गिरीधर तेलंगे यांनी लातूर शहर



महानगरपालिका कडून दिनांक २१/१२/२०१६ रोजीच्या ठराव क्रमांक ११६ नुसार स्क्राप मार्केट गोरक्षण मार्गे रींग रोड चौकास संत गाडगेबाबा चौक नावाचा ठराव घेऊन तसे फलक बसवण्यात आले होते नुकतेच राष्ट्रीय मार्ग यांच्या कडून बाय पास रींग रोड विकास कामात सदरील फलक काढण्यात आला होता आज संत गाडगेबाबा यांच्या स्मृती दिनानिमित्त चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते संत गाडगेबाबा नावाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले .

या वेळी प्रमुख पाहुणे चंद्रकांत बिराजदार यांनी आपल्या भाषणात थोर समाज सुधारक संत गाडगेबाबा यांनी माणसात देव शोधून मानवाचे शत्रू अंधश्रद्धा,अशिक्षितपणा, व अस्वच्छते विरोधात प्रबोधन करीत स्वतः स्वच्छता अभियान राबवित समाजाला स्वछतेचे महत्व पटवून दिल्याचे सांगितले या वेळी ग्यानदेव तेलंगे, गणपतराव तेलंगे,नर्सिंग जाधव,प्रा वैजनाथ जाधव , प्रशांत सुरवसे,सुधाकर सुरवसे, कृष्णा तेलंगे,बालाजी तेलघाणे,दत्ता पवार ,धोंडिबा चवळे,गणेश पवार इत्यादि उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा गिरीधर तेलंगे,मठपती मामा,केंद्रे सर ,गणेश कवठाळे इत्यादींने प्रयत्न केले उवस्थितांचे आभार प्रदर्शन गणपराव तेलंगे यांनी मानले.

# बीड च्या मानसी मनोज काळेचे अबॅकस परीक्षेत घवघवीत यश

बीड ।प्रतिनिधी

पुणे येथे झालेल्या जी चॅम्प अबॅकस संचलित गणेश काळे क्रीडांगण मंच स्वारगेट पुणे या ठिकाणी १५ डिसेंबर २०२४ रविवार जी - चॅम्प नॅशनल लेवल स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती या स्पर्धेत देशभरात सुमारे सुमारे ५००० विद्यार्थ्यांच्या सहभाग झालेला होता. यामध्ये निक कोचिंग क्लासेस स्वराज्य नगर बीड येथील मानसी मनोज काळे हीने ४ींह लेवल मध्ये सुपरस्टार बक्षीस मिळवले. क्लास संपर्क - ८४२१३९०७९५/९४०३०४०२७९

विद्यार्थ्यांच्या यशाच्या मागे जी - चॅम्प अबॅकस क्लासेसच्या संचालिका सौ. जया तिरगुळ मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन ठरले. तसेच क्लासेसचे यश पाहून जया तिळगुळ मॅडम यांना नॅशनल लेवल बेस्ट टीचर व बेस्ट फेंचाइसी प्रथम




क्रमांकाने (पुणे) गौरवण्यात आले. मुलांच्या व क्लासेच्या यशाच्या मागे शिक्षक स्टाफचाही मोलाचा वाटा आहे. यामध्ये सो.जयश्री जाधव मॅडम, कु. कुणीका फाटक मॅडम, सौ पल्लवी निकाळजे मॅडम, यांनीही मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. या स्पर्धेचे आयोजन पुणे येथे जी - चॅम्प अबॅकस चे डायरेक्टर श्री. योगेश देशमाने सर व सौ. आरती देशमाने मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# माजी नगरसेवकाकडून नप कर्मचाऱ्याला मारहाण

परळी / प्रतिनिधी

परळी नगर परिषद कार्यालयात घरकुल विभागातील एक कर्मचारी शासकीय कामकाज करत असताना एका माजी नगरसेवकासह अन्य तीन जणांनी येऊन त्यांच्याशी हुज्जत घातली. या कर्मचाऱ्यांस जातिवाचक शिवीगाळ करत मारहाण केली या प्रकरणी नगर परिषद कर्मचाऱ्याने परळी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असुन तीन व्यक्ती व अन्य अनोळखींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, नगर परिषद कर्मचारी सिद्धार्थ भारत गायकवाड (वय ३० वर्ष, व्यवसाय- नौकरी (चखड स्पेशालीस्ट) हे नेहमी पप्रमाणे शुक्रवार दि २० रोजी सकाळी नगर परिषद कार्यालयात येऊन शासकीय कामकाज करित असताना यातील आरोपी यांनी संगणमत करुन फिर्यादीस कामकाजा बाबत विचारणा केली व जातीवाचक शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच हाताबुक्काने मारहाण करुन शासकीय कामात अडथळा आणला म्हणुन अन्वर मीश्कीन शेख,



शेख अजीज इस्माईल, शहबाज सज्जाद बेग व इतर अनोळखी इसम यांच्याविरुद्ध गुरन - १९४/२०२४ कलम १३२,१२१ (१), ३५२, ३५१ (२),३५१(३),३(५) इछड सह कलम ३(१) (ी) (ी), ३(२) (िं) अजाज अप्रका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपवीभागीय पोलीस अधिकारी चार्ज गेवराई नीरज राजगुरु हे करीत आहेत. दरम्यान याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींमध्ये समावेश असलेले अन्वर मिश्कीन शेख हे माजी नगरसेवक आहेत तर दुसरा एक आरोपी शेख अजीज इस्माईल हे माजी नगरसेविकेचे पुत्र आहेत.

# परळीत अमित शहाच्या फोटोला जोडोमारो आंदोलन, आंदोलन कर्त्यांनी शहाच्या राजिनाम्याची केली मागणी

परळी ।प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे भारत रत्न शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल अपमानास्पद भाषेचा वापर करून त्यांचा अवमान करणाऱ्या गृहमंत्री अमित शहा यांच्या फोटोला संविधान प्रेमी व तमाम आंबेडकर जनतेच्या वतीने परळी शहरात जोडमारो आंदोलन करण्यात आले. तसेच यावेळी आंदोलनकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमित शहा याची केंद्रीय मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणीही केली.

आज दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे तमाम आंबेडकर विविध पक्ष व संघटनांच्या वतीने तसेच शहरातील संविधान प्रेमी नागरिकांच्या वतीने



गृहमंत्री अमित शहा यांच्या निषेधार्थ तीव्र निदर्शने करण्यात आली उपस्थित निदर्शकांनी यावेळी अमित शहा यांच्या प्रतिमेस जोडो मारो आंदोलन केले. त्यानंतर सर्व निदर्शकांनी भव्य अशी रॅली राणी लक्ष्मीबाई टावर ते तहसील कार्यालयावर काढण्यात आली. येथे तहसीलदार मार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन देण्यात आले.या आंदोलनात मोठ्या संख्येने भीमसैनिक, विविध पक्षाचे नेते, कार्यकर्ते, संविधान प्रेमी बांधव सहभागी झाले होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# तालुका कृषी कार्यालय स्थलांतरित न झाल्यास २ जानेवारीपासून आमरण उपोषण!

## रघुनाथ टेकुलवार यांचा इशारा

**दैनिक समर्थ राजयोग ( अशोक पडोळे)**

धर्माबाद- येथील तालुका कृषी कार्यालय येत्या १ जानेवारीपासून स्थलांतर न झाल्यास २ जानेवारी पासून आपण आमरण उपोषण करू असा ईशारा रघुनाथ बालाजी टेकुलवार यांनी लेखी निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकारी धर्माबाद यांना दिला आहे. तालुका निर्मितीपासूनच येथील तालुका कृषी कार्यालय हे बाजार समितीचे सभापती गणेशराव पाटील करखेलीकर यांच्या इमारतीमध्ये भाडेतत्त्वावर आहे. भाड्याने घेतलेल्या सदरील इमारतीमध्ये तळमजला व पहिला मजल्यावर कार्यालय थाटले असून अतिवृष्टी झाली तर तळमजल्यात कमरे इतके पाणी साचते. त्यामुळे बी बियाणे, खते, शेतीविषयक अवजारे व कार्यालयीन दप्तरे यांना नुकसान होते. त्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख गणेश गिरी व शहर प्रमुख अनिल कमलाकर यांनी या अगोदर पाठपुरावा केला होता. त्या पार्श्वभूमीवर सदरील कृषी कार्यालय हे नगरपालिकेच्या कॉम्प्लेक्स मध्ये स्थलांतरित करा असा शासनाचा आदेश प्राप्त झाला तरी अद्यापही सदरील कार्यालय स्थलांतरित झाले नाही म्हणून संदर्भीय पत्र जा.क्र./ता. क्र.अध/ भांडार/ इमा. स्थलांतर/ ७६८/२०२४ कार्यालय-तालुका कृषी अधिकारी धर्माबाद जिल्हा नांदेड या पत्रानुसार खाजगी इमारतीतून निमशासकीय इमारतीत एक जानेवारी २०२५रोजी स्थलांतर झाले नसल्यास दोन जानेवारीपासून कार्यालय स्थलांतर होईपर्यंत सदरील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा रघुनाथ टेकुलवर यांनी उपविभागीय अधिकारी यांना देत जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी देगलूर, तालुका कृषी अधिकारी धर्माबाद, तथा पोलीस ठाणे धर्माबाद यांना प्रतिलिपी मध्ये कळवले आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर दैनिक समर्थ राजयोग कृषी कार्यालयाच्या इमारतीचे मालक तथा बाजार समितीचे माजी सभापती गणेशराव पाटील करकेलीकर यांच्याशी संवाद साधला असता सदरील कार्यालय हे ३१ मार्च २०२६पर्यंत याच इमारतीमध्ये राहणार अशा प्रकारचे एग्रीमेंट कृषी विभागाने करखेलीकर यांच्याशी लेखी स्वरूपात केले असून सदरील कार्यालय त्या एग्रीमेंट नुसार स्थलांतरित झाल्यास आपण न्यायालयात दाद मागितली असल्याच्या प्रतिक्रिया त्यांनी दिल्या. व यापुढे कुठल्याही प्रकारची अतिवृष्टी झाली तरी तळघरात पाणी जाणार नाही याची दक्षता घेतली असल्याचे सांगितले.



# वादळी वाऱ्याने शेतकऱ्याच्या सोलारचे नुकसान

घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील मौजे बोधलापुरी शिवारातील गट क्र. १४५ मधील शेतकरी नारायण बाबासाहेब साबळे यांच्या शेतातील स्पॅन कंपनीच्या सोलारचे पॅनल वादळी वाऱ्याने पूर्ण फुटल्याने शेतकऱ्याचे खूप नुकसान झाले असून कंपनी कडून नुकसान भरपाई मिळण्याची अपेक्षा शेतकऱ्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.



बीड - जिल्हा वकील संघाचे ज्येष्ठ विधीज्ञ अँड यु डी चपळगावकर यांचे दुःखद निधन. भावपूर्ण श्रद्धांजली.

# परभणी .बीड व अमित शहा वक्तव्याच्या निषेधार्थ बहुजन जनता दलाची नागपूरच्या विधानभवनावर धडक

## मुख्यमंत्री व मंत्र्यासह शासकीय अधिकाऱ्यांना दिले निवेदन. पंडितभाऊ दाभाडे

पुणे ।प्रतिनिधी

परभणी येथील दलित युवक सोमनाथ सूर्यवंशी हत्या प्रकरण आणि बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्तीची सखोल चौकशी करून या हत्यामागील मुख्य सूत्रधार याला अटक करा याच्यासह भाजपाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लोकसभेच्या सभागृहामध्ये अपमान केला त्याचा निषेध करुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमित शहा यांची केंद्रीय गृहमंत्री पदावरून तात्काळ हकालपट्टी करावी या मागणीसह वेगळे विदर्भ राज्य झाले पाहिजे. ट्रॉसिटी कायदा कडक करावा. मराठा धनगर आणि मुस्लिमांना आरक्षण देण्यात यावी. शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देऊन त्यांचा सातबारा कोरा करावा. राज्यात महिला व दलित समाजावर होणारा अन्या अत्याचार तात्काळ थांबवावा. कापूस सोयाबीन कांदा याला योग्य भाव देऊन शेतकऱ्यांचे समाधान करावे या मागण्यासह सामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अनेक समस्या बाबत नागपूर येथे हिवाळी अधिवेशन स्थळी मोर्चाद्वारे जाऊन मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आणि मंत्र्यासह शासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन सदर समस्या सोडवून सामान्य नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी केल्याची माहिती पंडितभाऊ दाभाडे राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन जनता दल यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे बहुजन जनता दलाच्या वतीने पंडित भाऊ दाभाडे राष्ट्रीय अध्यक्ष बहुजन जनता दर यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथील संविधान चौक ते विधान भवन येथे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते सदर मोर्चा मध्ये बहुजन जनता दलाचे राज्यातील कार्यकर्ते यावेळी मंगेश कर्णिक राजेंद्र महल्ले संभाजी कदम गणेश तांबे तुकाराम उके किशोर तिवारी बाबासाहेब जाधव दिलीप बिरुटे दिपक निगडे साहेबराव मोरे छगन गावंडे फिरोज खान अब्दुल गफार खान जयकुमार साठेसह

# सततच्या 'बंद' ला दिंद्रूडकर पुरते वैतागले..!

## व्यापाऱ्यांनी कर्जाचे हफ्ते फेडायचे कसे?

दिंद्रुड ।प्रतिनिधी

वेगवेगळ्या कारणांमुळे पुकारण्यात येणाऱ्या सततच्या बंदला दिंद्रूडकर व व्यापारी आता पुरते वैतागले आहेत. छोटे - मोठे व्यवसाय व उद्योग यांची तर वाट लागली आहे. अनेकाचे या बंदमुळे कंबरडे मोडले आहे. छोटे दुकानदार भरडून निघत आहेत. ज्यांनी कर्ज काढून व्यवसाय उभारले आहेत त्यांना दिवसा तारे दिसत आहेत. कर्जाचे हफ्ते फेडायचे कसे असा यक्ष प्रश्न व्यापाऱ्यांपुढे पडत आहे. त्यामुळे राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते व लोकप्रतीनिधींनी यातून समंजसपणे काहीतरी मार्ग काढावा अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. व्यावसायिक दृष्ट्या अतिशय झपाट्याने वाढत असलेल्या मार्केटला बाहेरील व्यापारीवर्ग पहिली पसंती देतात. भुसार पासून ते सोन्याचांदीची खरेदी - विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे दररोज लाखोंची उलाढाल होते. फर्टीलायझर, सोयाबीन व कापूस यांची उलाढाल तर काही कोटी रुपयांत होते. इथला शेकडो वर्षांपासून भरणारा आठवडी बाजार पंचक्रोशीत लोकप्रिय आहे. मात्र मागच्या काही वर्षांपासून कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत होणाऱ्या बंद मुळे व्यापारी वर्गाला अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. तेंव्हा जानकार व सुज्ञ लोकांनी याबाबत पुढाकार घेऊन सामंजस्याने यातून काहीतरी मार्ग काढावा अशी व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे.

लोकशाहीत भारतीय राज्यघटनेने जनतेला आपले प्रश्न सोडवण्यासाठी किंवा निषेध व्यक्त करण्यासाठी बंदचे हत्यार दिले आहे. मात्र याचा आता सर्रास वापर होत असल्याचे दिसून येत आहे. बारीक सारीक कारणावरून व देश विदेशात घडलेल्या काही घटनांमुळे बंद पुकारण्याची प्रथा रूढ होत आहे. पूर्वी असे बंद मोठमोठ्या शहरात पुकारले जायचे, मात्र आता याचे लोन ग्रामीण भागात पसरत आहे. वारंवार बंद घोषीत केले जात आहेत, त्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत होत आहे. यापुढे 'बंद' हा विषय कायमचा 'बंद' होणे गरजेचे असल्याची मागणी आता पुढे येत आहे.

# भाजपचा,शहांच्या तोंडून आंबेडकर द्वेष समोर आला : अजिक्य चांदणे

**बीड ।प्रतिनिधी**

**भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आंबेडकर द्वेष अमित शहांच्या तोंडून देशाच्यासमोर आला. अशी तोफ डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे अजिंक्य चांदणे यांनी व्यक्त केली. दरम्यान परभणी येथील सोमवानाथ सुर्यवंशी या युवकांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पोलीस अधिकाऱ्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली.**

## बीडमध्ये अमित शहा यांचा पुतळा जाळून निषेध

बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे शुक्रवार (ता.२०) रोजी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळून निषेध नोंदविण्यात आला. यावेळी अजिंक्य चांदणे म्हणाले की,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा ही आंबेडकर द्वेषी असल्याचे देशाला आता माहीत झाले आहे. देशाच्या सर्वोच्च सभागृहात संघ प्रणित भाजपचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अवमानजनक भाष्य केले होते. त्यांच्या या बेताल वक्तव्याचा अवघ्या देशात निषेध नोंदविला जात आहे.अमित शहा संविधानामुळे गृहमंत्री झालेत, असे असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल एवढा तिरस्कार का? त्यामुळे अमित शहा यांना त्या पदावर राहण्याचा नैतिक अधिकार नाही. अशा व्यक्तीला गृहमंत्री पदावरून हटविले पाहिजे. कारण देशाचा गृहमंत्री असताना असे बेताल वक्तव्य करणे अशोभनिय आहे. त्यामुळे आज डेमोकॉटिक पार्टी ऑफ इंडिया कडून आम्ही त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून त्यांच्या बेताल वक्तव्याचा निषेध नोंदवित आहोत अशी तोफ डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी डागळली. यावेळी सुभाष लोनके,सुनिल पाटोळे, बाळासाहेब दोडके, यांच्यासह डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील गुंडगिरी, दहशतवाद संपवण्याचा निर्धार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आ.सुरेश धस यांनी मानले आभार

आष्टी ।प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणावर आमदार सुरेश धस यांनी सभागृहामध्ये जोरदार हल्लाबोल केल्यानंतर वस्तुस्थिती लक्षात आल्यामुळे बीड जिल्ह्यातील दहशतवाद गुंडगिरी आणि अवैध वाळू माफियांचे साम्राज्य उध्वस्त करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात व्यक्त केला त्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहामध्ये संतोष देशमुख हत्याप्रकरणी उत्तर देताना अत्यंत स्पष्टपणे सर्व घटनाक्रम सांगितला त्यामध्ये या प्रकरणातील संशयित सूत्रधार असलेल्या वाल्मिक कराड याचेवर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे त्याबद्दल कारवाई करण्यात येईल असेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. तसेच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचा तपास विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे कडे सोपवण्यात येणार असून तपासामध्ये निष्पन्न होणारे आरोपी कोणतेही असो त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला आहे या प्रकरणी तसेच बीड जिल्ह्यातील गुंडगिरी आणि दहशतवाद वाटला असल्यामुळे तसेच स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणी दुर्लक्ष करण्यात आल्याचा ठपका ठेवून बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करण्यात येणार आहे असेही त्यांनी घोषित केले.

बीड जिल्ह्यामधील मस्साजोग येथील अवादा कंपनीच्या पवन ऊर्जा प्रकल्पातील अधिकाऱ्याला दोन कोटी रुपयांची खंडणी मागितल्या प्रकरणी आणि धमकी दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल झालेला आहे त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होणारच आहे. मात्र या हत्येप्रकरणी जर वाल्मिक कराडचा हात असेल, तर त्याच्यावर मोक्का कायद्याअंतर्गत कारवाई केली जाईल असे सांगत

बीडच्या मस्साजोगमधील प्रकरण अत्यंत गंभीर आहे. याप्रकरणाची पाळेमुळे खोदून जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारावी लागेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत बोलताना स्पष्ट केले आहे. या हत्याप्रकरणी मास्टरमाईंड कोणीही असला तरी सोडणार नाही, बीडमध्ये शांतता प्रस्थापित करु,असेही फडणवीसांनी सांगितले. बीडमध्ये गुन्हे करणाऱ्यांची पाळेमुळे खोदून काढू, संपूर्ण प्रकरणाची एसआयटी चौकशी करु संतोष देशमुखांच्या कुटुंबियांना १० लाखांची मदत करण्यात येणार असल्याची माहिती देखील यावेळी फडणवीसांनी दिली.त्यानंतर बोलताना माझ्या मागणीवर अत्यंत समर्पक उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले,त्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो, बीड जिल्ह्याला आयपीएस दर्जाचा अधिकारी द्यावा असे आ.सुरेश धस यांनी म्हटले आहे.

# ऑल इंडिया पँथर सेना केज च्या वतीने तहसीलदार यांना निवेदन

केज/प्रतिनिधी

परभणी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील संविधान शिल्पलेखाची तोडफोड करणाऱ्या समाजकंटक आरोपीच्या मास्टरमाइंड ला अटक झाली पाहिजे त्या आरोपीवर देशद्रोहा चा गुन्हा दाखल करावा व सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या सर्व आरोपी वर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशा विविध मागण्या करण्यात आल्या पोलिसांच्या कोम्बींग ऑपरेशनची एकूण सर्व प्रकारची न्यायालयीन चौकशी करावी कलम १७६ (१-) सीआरपीसी अन्वये या प्रकरणाची चौकशी करावी. न्यायालयीन चौकशी ही सेवानिवृत्त न्यायाधीशा कडून न करता सीटिंग न्यायाधीशामार्फतकरावी. पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड सह इतर पोलीस अधिकाऱ्यांवर कलम ३२ अन्वये ट्रॉसिटी कायद्या अन्वये कलम ३(१)आणि ३ (२) प्रमाणे गुन्हे दाखल करावेत सोबतच सदोष मनुष्यवधाचा गुन्हादाखल करावा.परभणीशहरातील सर्व पोलीस स्टेशन मधील तातडीने सीसीटीव्ही जप्त करून ते सीसीटीव्ही तपासावेत.सोमनाथ व्यंकटेश सूर्यवंशी यांच्या कुटूंबियांना सरकारने तातडीने १कोटीची आर्थिक मदत जाहीर करावी.सोमनाथ व्यंकट सूर्यवंशी यांच्याकुटुंबातील एका व्यक्तीस प्रथम शासकीय नोकरी देऊन त्यांचे पुनर्वसन




करावे व वच्छलाबाई मानवते या महिलेला मारहाण करणाऱ्या पोलिसांवर तातडीने ३५४,३०७ अंतर्गत गुन्हे दाखल करून त्यांना निलंबित करावे.वच्छलाबाई मानवते यांना सरकारने दहा लाख रुपये आर्थिक मदत करून त्यांचे पुनर्वसन करावे. न्यायालयीन कोठडीत असलेल्या अणि रुग्णालयात उपचार घेत असलेल्या सर्वांचे पुन्हा एकदा न्यायाधीश यांच्या उपस्थितीत मेडिकल करावे पोलिसांनीकेलेल्या कोम्बींग कारवाईत बौद्ध वस्तीत लोकांच्या झालेल्या घरांचे नुकसान भरपाई द्यावी जिल्हा प्रशासनाने त्या सर्व घराचे तातडीने पंचनामे करून घ्यावे पोलिसांच्या कारवाईत जखमी झालेल्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी १० डिसेंबर २४ रोजी पार पडलेल्या सकल हिंदू समाज मोर्चातील संयोजक यांची चौकशी करावी यासोबत त्या मोर्चातील सर्वांची भाषणे तपासून त्यांच्यावर कारवाई करावी.संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाच्या धर्तीवर जी सीआयडी व एसआयटी लावली ती सोमनाथ सूर्यवंशी यांच्या तपासा साठी लावावी.महिला विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्यात यावेत महाराष्ट्रा मध्ये ज्या ज्या ठिकाणी महापुरुषांचे पुतळे आहेत त्या त्या ठिकाणी पोलीस प्रोटेक्शन देण्यात यावे व सिसीटीव्ही बसविण्यात यावेतदलित बौद्धवस्तीत घुसून रिक्षा मोटरसायकल फोडताना पोलिसांचा व्हिडिओ व्हायरल होत आहे.याची चौकशीकरून संबंधित कारवाई झाली पाहिजे.जिल्हाधिकाऱ्यांनी व पोलिसअधीक्षकांनी बौद्ध वस्तीमध्ये शांतता बैठक घेऊन.भयभीत समाजात विश्वास निर्माण केला पाहिजे अशी ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने मागणी करण्यात आली आहे.उपस्थित ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुकाध्यक्ष समाधान बचुटे,जिल्हा महासचिव अनिल उजगरे,तालुका उपाध्यक्ष अमित बचुटे, अमोल शिंदे,सचिन भालेराव,निलेश वाघमारे तसेच इतर कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.